तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय

रामाक्र.एन.ए.पी.३४/कठोरा बु.- ०६ /२०१६-२०१७

अर्जदार:- एस.एस.बी. असो.तर्फे १) श्री.कपिल सुरेंद्र आंडे
२) श्री.स्वप्नील अनिलराव ढवळे दोन्ही रा.अमरावती

आदेश

(आदेश पारीत दिनांक- ११ /११/२०१६)

अर्जदार एस.एस.बी.असो.तर्फे १) श्री.कपिल सुरेंद्र आंडे २) श्री.स्वप्नील अनिलराव ढवळे दोन्ही रा.अमरावती यांनी रा.मा.क्र.एन.ए.पी.३४/कठोराबु.-२९/२०१५-२०१६ आदेश दिनांक ६/५/२०१६ अन्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक मंजूर करण्यात आलेल्या मौजा कठोरा बु.ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं.८५/३ क्षेत्र ०.५४ हे. आर जमीनीवरील प्लॉट क्र.१ क्षेत्र २८७१.३४ चौ.मी.जागेवर बांधकाम करण्याची परवानगी मिळणेबाबत दाखल केलेल्या अर्जावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले. अर्जासह अर्जदारानी अकृषक आदेश,मंजूर अभिन्यास,७/१२ व बांधकाम नकाशाच्या प्रती इ.दस्ताऐवज दाखल केला.

प्रकरणांत पत्र क्र.कलि/प्रस्तु-१/बांधकाम परवानगी/कावि-९९९/२०१६ दिनांक २६/०५/२०१६ अन्वये प्राप्त दस्ताऐवज अभिप्रायाकरिता/मंजूरातीकरिता सहायक संचालक नगर-रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचेकडे पाठविण्यात आला.

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांनी पत्र क्र.बांध पर/मौ.कठोरा/ता.जि.अम/स.नं.८५/३-अ/भु.क्र.१/ससंनर-अम/१७०३ दिनांक २३/०८/२०१६ अन्वये बांधकाम मंजूरी कामी शिफारस करता येत नसल्याबाबत कळविल्यावरुन त्याप्रमाणे अर्जदारांना दिनांक २३/८/२०१६ चे पत्रान्वये कळविण्यात आले परंतू अर्जदारांनी सह संचालक नगर रचना अमरावती यांना पुन्हा पत्र देण्याबाबत दिनांक २३/८/२०१६ रोजी अर्ज सादर केल्यावरुन या कार्यालयाचे पत्र क्र.अका/प्रस्तु-१/बांधकामपरवानगी/कावि-१६५९/२०१६ दिनांक २३/८/२०१६ नुसार अर्जदाराचे विनंती अर्जावरुन सहसंचालक नगर-रचना अमरावती यांना पत्र देण्यात आले.

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे पत्र क्र.बां.प/मौ.कठोराबु/ता.जि.अमरावती/स.नं.८५/३/भु.क्र.१/ससंनर-अम/२०५४ अमरावती दिनांक २८/१०/२०१६ अन्वये पत्रातील अटी व शर्तीनुसार शिफारसीसह मंजूर बांधकाम (Recommanded for Approval) अभिन्यासाच्या प्रमाणित प्रती प्राप्त. सोबत बंधपत्र व प्रतिज्ञापत्र प्राप्त.

सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे पत्रातील अटी व शर्तीनुसार आवेदकास बांधकाम करण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसारच आवेदकाने बांधकाम करणे बंधनकारक राहील.

अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:-

१) जागेचे मालकी हक्क बाबत महसूल विभागाकडून खातीरजमा करण्यात यावी.
२) सहायक कार्यकारी अभियंता अमरावती पाटबंधारे उपविभाग क्र.१ अमरावती यांचे पत्र क्र.५२१/ताशा/२०१६ दिनांक १६/०८/२०१६ अन्वये बोर नदी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील मौजा टाकळी,कठोरा व रेवसा या शिवारात कालव्याची कामे होणार नाही याबाबत अभिप्राय प्राप्त झालेला आहे.
३) विषयांकित बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे.(उदा.७/१२ उतारा,नकाशा,अभियंत्याचे अनुज्ञाप्ती पत्र इ.) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अस्तावत नोंदीबाबत महसूल विभागाकडून खात्री करण्यात यावी.
४) आवेदकाने करुन दिलेले बंधपत्र त्यांना बंधनकारक राहील.
५) प्रस्तुत बांधकाम नकाशांना या कार्यालयाकडून मंजूरी अदा केल्यानंतर व बांधकाम परवानगी दिल्यानंतर सुदर परवानगी ही एक वर्षाकरिता वैध राहील.

६) बांधकाम परवानगीप्रमाणे सुरु असल्याची तपासणी नियमाप्रमाणे वेळोवेळी महसूल विभागाकडून करुन घेण्यात यावी. तद्दतच जोता व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

७) अकृषक परवानगी आदेशातील अटी/शर्ती अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहतील.

८) मंजूर प्रादेशिक योजना,अमरावतीकरिता लागू असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीप्रमाणे बांधकाम करणे व विषयांकित मंजूर वापराकरिताचे सदर बांधकामाचा वापर करणे अर्जदार/भुखंडधारक/विकासकर्ते यांचेसह सर्व उर्वरितांवर बंधनकारक राहील.

९) मंजूर नकाशाप्रमाणेच बांधकाम करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/ भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर राहील अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अनाधिकृत बांधकामावर वेळेवर कार्यवाही सक्षम प्राधिकरणाकडून प्रस्तावित करण्यात येईल.

१०) आजूबाजूचे वहिवाटीला बाधा होणार नाही यांची दक्षता अर्जदार/ भुखंडधारक/ विकासकर्ते यांनी घेणे बंधनकारक राहील.

११) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुतचे बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्याचे जमीनीमध्ये पुर्नभरण करण्याचे प्रकल्पाचे (Rain Water Harvesting) बांधकाम करणे अर्जदार/ भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

१२) सौर उर्जेवर पाणी तापविणे व अग्नीशमन व्यवस्था प्रस्तावित उद्वहिनी इ.बाबी विकसित करणे अर्जदार/ भुखंडधारक/विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील. व त्या भोगवटा प्रमाणपत्र घेणेपुर्वी वापर योग्य विकसित करणेही त्यांचेवर बंधनकारक राहील. या सुविधा वापरणाऱ्या सर्व संबंधितावर उक्त सुविधा विकसित झाल्यानंतर व वापरात आल्यानंतर सुस्थितीत व वापरात ठेवणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१३) बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर नकाशावर नमुद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित देखरेख करणारे वास्तुशिल्पी व अर्जदार/ भुखंडधारक/विकासकर्ते जबाबदार राहतील.

१४) प्रस्तावासोबतच्या उपलब्ध कागदपत्राच्या आधारे या कार्यालयाने मंजूरीची शिफारस केली आहे. सदर्हु कागदपत्रे बोगस वा दिशाभुल करणारे असल्यास त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

वरील अटी व शर्तीनुसारच आपेदकास जोता पातळी (Plinth Level) पर्यंत बांधकामाची परवानगी देण्यात येत आहे. त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र घेवूनच पुढील बांधकाम परवानगी प्राप्त करुन घ्यावी.

तहसिलदार अमरावती

प्रतिलिपी:-

१) मा.उपविभागीय अधिकारी अमरावती यांना माहितीस सविनय सादर

२) उपअधिक्षक भुमी अभिलेख अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता सस्नेह सादर.

३) तलाठी सजा कठोरा बु. ता.जि.अमरावती यांना माहितीस रवाना.

४) एस.एस.बी.असो.तर्फे १) श्री.कपिल सुरेंद्र आंडे २) श्री.स्वप्नील अनिलराव ढवळे दोन्ही रा. अमरावती यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस रवाना.

तहसिलदार अमरावती

तहसिलदार अमरावती

तहसिलदार अमरावती यांचे कोर्ट

रामाक्र.एन.ए.पी.३४/कठोरा बु.-२९ /२०१५-२०१६

अर्जदार :- एस.एस.बी.असो.तर्फे १) श्री.कपिल सुरेंद्र आंडे २) श्री.स्वप्नील अनिलराव ढवळे दोन्ही रा.अमरावती

आदेश

(आदेश पारीत दिनांक- ०६ / ०५ /२०१६)

१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (१) नुसार अर्जदार एस.एस.बी.असोसिएट्स तर्फे भागीदार १) श्री.कपिल सुरेंद्र आंडे २) श्री.स्वप्नील अनिलराव ढवळे दोन्ही रा.अमरावती, मौजा कठोरा बु. ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.८५/३-अ भोगवट वर्ग-१ क्षेत्र ०.५४ हे आर जमीन निवासी प्रयोजनार्थ अकृषक करुन मिळणेबाबत दिनांक ०१/१०/२०१४ रोजी संयुक्त अर्ज सादर केला. सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांनी पत्र क्र.अकृषक/मौ कठोरा बु./ता.जि.अमरावती/सनं.८५/३-अ/संसनर-अम/१४९३ अमरावती दिनांक ३०/९/२०१४ अन्वये सिमांकनास मंजूरी दिलेल्या पत्राची प्रत व मंजूर सिमांकित अभिन्यासाची (Recommanded for Demarcation) च्या प्रती दाखल केल्या.

२) सहाय्यक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र.जा.क्रं./अकृषक/मौ.कठोरा बु./ता.जि.अमरावती/सनं.८५/३-अ/संसनर-अम/१८३३ अमरावती दिनांक २०/१२/२०१४ नुसार परवानगी ची शिफारस व मंजूर अभिन्यासाच्या (Recommanded for Approval) च्या प्रती मंजूराती करिता सादर केलेल्या आहेत.

३) उपरोक्त अकृषक प्रकरणात सहाय्यक संचालक नगर रचना अमरावती, जिल्हा आरोग्य अधिकारी जिप अमरावती, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, सहायक कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्र.४ अमरावती, कार्यकारी अभियंता अती उच्च दाब बांधकाम तारमार्ग अमरावती, भुसंपादन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, मंडळ अधिकारी नवसारी तलाठी कठोरा बु.व सचिव ग्रामपंचायत कठोरा बु. यांचे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

४) प्रकरणांत सदर सर्व्हे नं.करिता ना.जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेश क्रमांक अका/एमएजी/डे-२७/कावि-६७१/२०१४ दिनांक २८/८/२०१४ व आदेश क्रमांक अका/एमएजी/डे-२७/कावि-८४२/२०१४ दिनांक २०/११/२०१४ अन्वये जैसे थे (Status quo) दिलेले आदेश दिनांक २९/३/२०१६ चे आदेश क्र.नझुल/कक्ष-२/अका/कावि-३६७/२०१६ अन्वये कायम ठेवण्याची आवश्यकता नसल्याबाबतचे आदेश प्राप्त.

वरील दस्ताऐवजानुसार प्रकरण आदेशाकरिता घेण्यात आले परंतु प्रकरणातील दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता तत्कालीन तलाठी मौजा कठोरा बु.यांनी सर्व्हे नं.८५/३-अ नुसार चुकीच्या दिलेल्या ७/१२ वरुन प्राप्त झालेले आहे, परंतू प्रकरणांत दाखल फेरफाराचे अवलोकन केले असता सर्व्हे नं.८५/३ आहे व सद्यास्थितीत तलाठी यांनी सर्व्हे नं.८५/३ चा ७/१२ दाखल केलेला आहे. त्यानुसार सर्व्हे नं.ची पडताळणी करणेकरीता मंडळ अधिकारी नवसारी यांचा अद्यावत अहवाल मागविण्यात आला त्याचे अहवालानुसार सर्व्हे नं.८५/३ हा आहे. तसेच अर्जदाराने दिनांक २१/४/२०१४ ची दाखल केलेल्या मोजणी क प्रत वर सर्व्हे नं.८५/३ असून जुन्या ७/१२ नुसार त्यांनी सर्व्हे नं.८५/३-अ हस्तलिखीत नोंद उपअधिक्षक भुमी अभिलेख अमरावती कार्यालयाकडून करुन आणल्याचे मान्य केले आहे तसेच सर्व्हे नं.८५/३-अ नसून सर्व्हे नं. ८५/३ असल्याबाबत १००/- रु.स्टॅम्प पेपरवर अर्जदाराने करुन दिलेले बंधपत्र त्यांना बंधनकारक राहील.

५) सदरहु जमिनीचा महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६/१०/१९७१ मध्ये प्रसिध्द झाल्याप्रमाणे वर्ग-२ च्या गावात अंतर्भाव होतो. व महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक ०६/०८/२००७ नुसार निवासी प्रयोजनाकरिता अकृषक आकार रु.००.०५ प्रति चौ.मी.आहे. प्रस्तुत प्रकरणातील जमिनीचा निवासी प्रयोजनार्थच वापर राहणार असल्याने अकृषक आकारणी दर म्हणजे रु.०.०५ प्रति चौ.मी.राहील. ऍमिनीटी प्लॉट खालील क्षेत्राचा दर ०.१५ प्रती चौ.मी.राहील. त्याचप्रमाणे अर्जीत जमीनीचा तपशील व अकृषक आकारणी खालीलप्रमाणे येईल.

अ.क्र.	जमीन वापराचा तपशिल	एकुण क्षेत्रफळ चौ.मी.	अकृषक प्रमाणित दर प्रती चौ.मी रु.पै.	अकृषक आकारणी रुपये पैसे
१	निवासी प्लॉट १ व २ खालील क्षेत्र	३४७६.०४	०.०५	१७४/-
२	ऍमिनिटी प्लॉट क्र.३ चे क्षेत्र	२७०.००	०.१५	४१/-
३	खुल्या जागेचे क्षेत्र	६०८.३०	०.०५	३०/-
४	रस्त्याखालील क्षेत्र	६४५.६६	०.०५	३२/-
५	वाल्यालगत मालकाचे क्षेत्र	४००.००	०.०५	२०/-
		५४००.००		२९७/-

६) खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनिक कामाकरिता वापरायची असल्यामुळे या जमीनीवरील अकृषक आकारणीत खालीलप्रमाणे सुट देण्यात आली आहे.

अ.क्र.	जमीन वापराचा तपशील	एकुण क्षेत्रफळ चौ.मी.	अकृषक प्रमाणित दर प्रती चौमी	अकृषक आकारणी रु पैसे
१	खुल्या जागेचे क्षेत्र	६०८.३०	०.०५	३०/-
२	रस्त्याखालील क्षेत्र	६४५.६६	०.०५	३२/-
	एकुण	१२५३.९६		६२/-

त्याचप्रमाणे प्रत्येक भुखंडास किती अकृषक आकारणी करण्यात आली आहे याचा तक्ता प्रकरणात आदेशासोबत जोडला आहे. अर्जीत जमीनीच्या ७/१२ (अधिकार अभिलेख) च्या प्रतीचे अवलोकन केले असता अर्जदार सदर जमीनीचे वर्ग-१ म्हणून खातेदार असून भुस्वामी या हक्काने धारक आहे.

७) मी तहसिलदार अमरावती महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (२) अन्वये मौजा कठोरा बु. ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं.८५/३, क्षेत्र ०.५४ हे आर निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्याची परवानगी सहाय्यक संचालक नगर रचना अमरावती यांनी घालून दिलेल्या अटींना अधिन राहून तसेच खालील अटी शर्तीवर मंजूरी देत आहे.

अटी व शर्ती

१) अभिन्यासातील खुली जागा,रस्ते या व्यतिरिक्त इतर सर्व भुखंडाचा उपयोग रहिवास वापरासाठी करण्यात यावा.

२) भविष्य काळात अभिन्यासातील भुखंडाचे पुर्व परवानगी शिवाय विभाजन करण्यात येवू नये.

३) सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा उपयोग त्याच कारणाकरिता करावा व सदर खुली जागा आवेदकाने विनामुल्य स्थानिक प्राधिकरणाकडे व्यवस्थेसाठी हस्तांतरीत करावी.

४) अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्याचे जमीनीमध्ये पुनर्भरण करणेच्या प्रकल्पाचे बांधकाम करणे महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व मा.जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार बंधनकारक राहील.

५) जागेचा वापर बदलवयाचा झाल्यास पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील. लगतच्या अभिन्यासातील रस्ते बंद करण्यात येवू नये.

६) अभिन्यासात विद्युत दाब वाहीनी असल्यास त्याची आखणी आवदेकाने स्वखर्चाने रस्त्याचे बाजूने स्थलांतरीत करुन घ्यावी. योग्य ते सामाईक अंतरे प्रस्तावित करण्यात यावे.

७) अभिन्यासातील भुखंडात बांधकाम करतांना बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम विषयक नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

८) सदर जागेतील वृक्षाचे संरक्षण करावे.

९) अभिन्यासातील रस्ते,नाल्या,लहानपुल इ.बांधकाम आवेदकाने स्थानिक प्राधिकरणाच्या व मा.जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार विकसीत करुन ते त्यांचेकडे विनामुल्य हस्तांतरीत करावे व त्यानंतरच अभिन्यासातील भुखंड विकावे.

१०)महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु रुल्स् १९६९ (जमीनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या कलम-४ च्या अटीचे पालन करावे.

११)उक्त क्षेत्रास लागू प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६.८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अभिन्यासातील रस्ते,नाल्या,पुल,सिवर लाईन,पाणी पुरवठा लाईन,विद्युत पुरवठा लाईन खुल्या जागेचा विकास इ.सर्व पायाभुत व मुलभुत विकास कामे विहीत मुदतीत करण्याची सर्वच जबाबदारी जमीन मालकाची/विकासकाची राहील.

१२)सदर्हु प्रकरणांत अभिन्यास नकाशांना शिफारस करतांना अर्जदाराने दाखल केलेले मालकी हक्काचे कागदपत्रे व मोजणी नकाशा इ.कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहे. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभुल करणारे आढळल्यास सदर अभिन्यास मंजूरीची शिफारस रद्द समजण्यात येईल.

१३)अर्जीत शेत जमीनीमधील निवासी प्रयोजनार्थ जमीनीचे क्षेत्रफळ ३८७६.०४ चौ.मी.+ऍमिनीटी प्लॉट नं.०३ चे क्षेत्र २७०.०० चौ.मी.असे एकुण क्षेत्रफळ ४१४६.०४ चौ.मी.आहे. त्यावर वार्षिक अकृषक आकार प्रती चौ.मी.रु.००.०५ पैसे व ५.१५ पैसे याप्रमाणे रु.२३५/- (अक्षरी-दोनशे पस्तीस रु) अकृषक आकारणी कायम करण्यात आले आहे. ही आकारणी महाराष्ट्र राज्य राजपत्र दिनांक ११/०२/२००८ मध्ये प्रसिध्द झाल्यानुसार आकारण्यात येत आहे. त्यांनतर जी सुधारीत आकारणी शासन घोषित करेल त्याप्रमाणे भरण्यास अर्जदार बंधनकारक असेल.

१४)शासन परिपत्रक क्रं.एन.ए.१०७९/आय.एस.३/महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १८/०४/१९७९ व कलम ४७ चे रुपांतरीत करातील दुरुस्ती प्रमाणे महानगर पालिका लगतचे क्षेत्रात अकृषक आकाराच्या ५ पट रुपांतरीत कर रु.११७५/- भरणे आवश्यक आहे.तसेच जि.प.कर ७ पट रु.१६४५/- व ग्रा.पं.कर १ पट रु.२३५/- एवढा भरावा लागेल तसेच वेळोवेळी होणारे बदल अर्जदारास बंधनकारक राहतील.

१५)अ) वरीलपैकी कोणत्याही अटीचे अथवा शर्तीचे उल्लंघन झाल्यास उक्त बाबीत जे नियम अस्तिवात असतील त्याचप्रमाणे तहसिलदार अमरावती जो दंड अथवा आदेश देतील ते पालन करण्यास आवेदक बंधनकारक राहील.

रामाक्र.एन.ए.पी-३४/कठोरा बु.- २९ /२०१५-२०१६
दिनांक :- ०६ / ०५ /२०१६ चे आदेशान्वये मंजूर

ब) वर नमुद केलेल्या व्यतीरिक्त जे बांधकाम नियमबाहय असेल ते बांधकाम पाडण्याचे सक्षम अधिकारी यांचे आदेश आवेदकांस बंधनकारक राहतील. सदर अर्जदारांनी स्वत: स्वखर्चाने न पाडल्यास ते शासनाकडुन पाडण्यात येईल व यासाठी येणारा खर्च अर्जदाराकडून शासकिय थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

१६) अर्जदाराला स्थानिक प्राधिकरण व तहसिलदार अमरावती यांचे पुर्वपरवानगीशिवाय तसेच शासनाच्या संबंधीत विभागाची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय अर्जीत जागेवर कोणतेही बांधकाम करात येणार नाही.

१७) अर्जदारांनी वर नमुद केलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.

१८) अर्जदाराला खुल्या जागेवर भुखंड पाडून त्यांची विक्री करता येणार नाही.

१९) अर्जदाराला सहाय्यक संचालक नगररचना अमरावती यांचे पत्र क्रं/अकृषक/मौजा कठोरा बु. /ता.जि.अम/सनं.८५/३-अ/संसनर अमं/१८३३ अमरावती दिनांक २०/१२/२०१४ मधील अटीचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

२०)रस्त्याच्या कडेला १०० झाडांचे वृक्षरोपनाचे उद्दीष्ट देण्यात येत आहे.

२१)मुख्य रस्त्यापासून पोच मार्गाकरिता सा.बां.विभाग,अमरावती या विभागाची वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

२२)शासनाच्या धोरणानुसार अकृषक सुलभ करण्याकरिता अर्जदाराला नविन प्रकरण तयार करुन कागद पत्र गोळा करायला लावणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही परंतू नगर रचना विभागाच्या भुखंड अभिन्यासात ७/१२ नुसार सर्व्हे नं. ८५/३ अशी दुरुस्ती करुन घेणे अर्जदाराला बंधनकारक राहील त्याशिवाय कोणतेही विक्री अथवा इतर व्यवहार करता येणार नाही याशर्ती वर अकृषक मंजूरात देण्यात येते.

२३)भविष्यात सदर जमीनीबाबत दिवाणी अन्य कोणताही वाद उद्भवल्यास अर्जदारास बंधनकारक राहील.

वरीलपैकी कोणतीही अट आवेदकास मान्य नसल्यास हा आदेश रद्द करण्यात येईल.

०६/०५/२०१६
तहसिलदार अमरावती

प्रतिलिपी:-

१) उपअधिक्षक,भुमी अभिलेख अमरावती यांना माहिती व कार्यवाहीस अग्रेषित.

२) तलाठी कठोरा बु. यांना माहितीकरिता रेकॉर्डला आवश्यक नोंद घेऊन दुरुस्ती करण्यासाठी रवाना.

३) जमाबंदी लिपीक तहसिल कार्यालय अमरावती.

४) सचिव,ग्रामपंचायत कठोरा बु. ता.जि.अमरावती

५) एस.एस.बी.असोसिएट्स तर्फे भागीदार १) श्री.कपिल सुरेंद्र आडे २) श्री.स्वप्नील अनिलराव ढवळे दोन्ही रा.अमरावती यांना माहिती करिता रवाना.

तहसिलदार अमरावती

०६/०५/२०१६
तहसिलदार अमरावती